जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 AUG 2021
पुढारी

# विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागातील २३ विद्यार्थ्यांची देशातील अग्रगण्य कंपन्यांमध्ये निवड

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागात संगणकशास्त्र आणि तंत्रज्ञान शाखेतील (२०२०-२१) अंतिम वर्षातील २३ विद्यार्थ्यांची निवड देशातील अग्रगण्य आयटी व मल्टिनॅशनल कंपन्यांमध्ये झाली आहे.

संगणकशास्त्र शाखेप्रमाणेच इलेक्ट्रॉनिक्स व टेलिकम्युनिकेशन तंत्रज्ञान अधिविभागातील सहा विद्यार्थी मल्टिनॅशनल आयटी कंपनीत निवडले गेले आहेत. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी .एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. या विद्यार्थ्यांना तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. आर. के. कामत यांचे मार्गदर्शन लाभले. संगणकशास्त्र व तंत्रज्ञान विभागाचे व इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन तंत्रज्ञान विभागाचे समन्वयक डॉ. आर. जे. देशमुख, डॉ. एस. बी. चव्हाण यांचे सहकार्य लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

27 AUG 2021

पुढारी

# लैंगिक छळ प्रतिबंधाविषयी जागृती आवश्यक : प्र-कुलगुरू डॉ. पाटील

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ प्रतिबंधाविषयी विद्यार्थिनी, महिला यांच्यासह पुरुषांमध्ये जागृती आवश्यक आहे, असे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील अंतर्गत तक्रार समिती व बेटी बचाओ अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने 'कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ प्रतिबंध' या विषयावर आयोजित एकदिवसीय ऑनलाईन जागृती कार्यक्रमात ते बोलत होते.

प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, लैंगिक समता, समानता प्रस्थापनेच्या दिशेने आणि कामाच्या ठिकाणी महिलांची प्रतिष्ठा जोपासून ती वृद्धिंगत करण्याच्या दिशेने टाकलेले हे महत्त्वाचे पाऊल आहे. यासंदर्भात वेळोवेळी प्रबोधन करणे आवश्यक आहे. या सत्राचे प्रास्ताविक अंतर्गत तक्रार समिती अध्यक्ष डॉ. व्ही. पी. कट्टी यांनी केले. डॉ. आर. जी. बारवेकर यांनी आभार मानले.

पुण्याच्या नारी समता मंचाच्या प्रीती करमरकर यांनी कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ प्रतिबंध याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तनुजा शिपूरकर यांनी मार्गदर्शन केले. बेटी बचाओ अभियानाच्या समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई यांनी परिचय करून दिला. एस. एस. अडसुळे यांनी आभार मानले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, वित्त व लेखा अधिकारी व्ही. टी. पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 AUG 2021
तरूण भारत

# प्रतिकुल परिस्थितीत न डगमगता उभे राहा

■ ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

कोरोनाच्या महामारीच्या काळात लोकांच्या नोकऱ्या गेल्याने बहुसंख्य कुटुंबे दारिद्ररेषेखाली गेली आहेत. ही परिस्थिती बदलण्यासाठी जनतेला एकजुटीने काम करण्याची गरज आहे. त्याचबरोबर प्रतिकूल परिस्थितीतही न डगमगता उभे राहायला शिकले पाहिजे असे प्रतिपादन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांनी केले.



डॉ. नरेंद्र जाधव

शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र अधिविभागाच्या वतीने 'आर्थिक धोरणे व सद्यस्थिती" या विशेष ऑनलाईन व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. या व्याख्यानमालेच्या उद्‌घाटनप्रसंगी 'माझा जीवनकाळ" या विषयावर डॉ. जाधव बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. यशवंतराव थोरात, प्र- कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. जाधव यांनी आपल्या इथिओपियातील सरकारचे आर्थिक सल्लागार, हवाला मार्केट अभ्यासासाठी दुबईला गुप्त भेट, इंटरनॅशनल मॉनिटरी फंड (आयएमएफ)मधील साडेचार वर्षे आणि नॅशनल एडव्हायजरी कौन्सिल व नियोजन आयोगातील कारकीर्दीचा आढावा घेतला.

अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, डॉ. नरेंद्र जाधव यांनी केलेले मार्गदर्शन केवळ, संशोधक, अर्थतज्ज्ञांसाठीच नव्हे, तर प्रत्येक कुटुंबाला उपयुक्त ठरणार आहे. प्रास्ताविक अर्थशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. ज्ञानदेव तळुले यांनी केले. डॉ. यशवंतराव थोरात यांनी परिचय करून दिला.

2 7 AUG 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हा[illegible]

पत्नीकडून ४५६ ग्रंथ सुपूर्द

# कवी ना. वा. देशपांडे यांची ग्रंथसंपदा शिवाजी विद्यापीठाकडे

लोकमत न्यूज नेटवर्क,

कोल्हापूर : जुन्या पिढीतील ज्येष्ठ



दिवंगत कवी ना. वा. तथा नारायण वामन देशपांडे यांच्या इच्छेनुसार त्यांची समग्र ग्रंथसंपदा त्यांच्या पत्नी सुनंदा देशपांडे यांनी शिवाजी विद्यापीठाच्या बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राकडे बुधवारी सुपूर्द केली. विद्यापीठाकडून उपग्रंथपाल डॉ. डी. वी. सुतार यांनी ग्रंथसंपदा स्वीकारली.

कवी देशपांडे यांनी त्यांच्या हयातीत कविता, गीतांसोबतच अनेक नामवंत शाहिरांसाठी लेखन केले. त्यांचे दोन वर्षांपूर्वी वयाच्या ८६व्या वर्षी निधन झाले. त्यांच्याकडे महाभारत, भगवद्गीता, त्यांवरील भाष्ये, संतसाहित्य यांसह अनेकविध प्रकारची दुर्मीळ ग्रंथसंपदा होती. आपल्या माघारी ही ग्रंथसंपदा भावी पिढ्यांच्या उपयोगी पडावी, अशी त्यांची इच्छा होती. त्यांच्या माघारी पत्नी सुनंदा यांनी विद्यापीठाच्या बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयास देणगी स्वरूपात एकूण ४५६ ग्रंथ सुपूर्द केले. प्रा. शशिकांत चौधरी यांचे या प्रक्रियेसाठी सहकार्य लाभले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आणि ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत यांचे मार्गदर्शन लाभले.

## कवी देशपांडे यांच्याविषयी थोडक्यात

कवी देशपांडे हे कोल्हापुरातील अनेक शाहिरांचे लाडके कवी होते. त्यांच्या अनेक रचना संगीतकार दिनकरराव पोवार यांनी संगीतबद्ध केल्या आहेत. शीघ्रकवी लहरी हैदर, ज्येष्ठ कवी ग. दि. माडगूळकर आणि ज्येष्ठ साहित्यिक शिवाजी सावंत यांच्याशी त्यांचा मोठा स्नेह होता. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या विचारकार्याचा त्यांच्यावर मोठा प्रभाव होता.



कोल्हापुरात बुधवारी दिवंगत कवी ना. वा. देशपांडे यांचा ग्रंथसंग्रह शिवाजी विद्यापीठाकडे सुपूर्द करण्याबाबतचे पत्र उपग्रंथपाल डॉ. डी.बी. सुतार यांना सुनंदा देशपांडे यांनी दिले.